# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: २२१६ ३९६४/ २२१६ ३९६५
ई-मेल: mercindia@merc.gov.in / संकेत स्थळ: www.merc.gov.in
सन २०२२ चे प्रकरण क्र. ८९

जाहिरात क्रमांक.: 22/2022-23

## जाहीर सूचना

**टाटा पॉवर कंपनी लिमिटेड - पारेषण यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठी केलेल्या अर्जावर अभिप्राय मागवण्यासाठी.**

१. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड - पारेषण व्यवसाय (टीपीसी-टी) यांनी त्यांना परवाना मंजूर झाल्यानंतर पारेषण वाहिन्या/बेज कार्यान्वित केल्यामुळे/सेवेतून काढल्यामुळे /फेरबदल केल्यामुळे सुधारित मत्तेची स्थिती अद्ययावत करण्याकरिता त्यांच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (मविनिआ किंवा आयोग) अर्ज केला आहे.

२. टीपीसी-टी ने खालील व्यापक वर्गवारीमध्ये पारेषण वाहिन्या/बेजच्या सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत-

- प्रस्तावित -पारेषण वाहिन्या/बेजच्या यादी"मधील पारेषण वाहिन्या/बेज कार्यान्वित झाल्यानंतर पारेषण परवान्यातील " विद्यमान पारेषण वाहिन्या/ बेजच्या यादी" मध्ये स्थलांतरित करणे.
- "विद्यमान पारेषण वाहिन्या/बेजच्या यादी" मध्ये पारेषण वाहिन्या/बेजची भर टाकणे/काढून टाकणे.
- पारेषण परवान्याच्या दुसऱ्या सुधारणेमध्ये राहून गेलेल्या बेजची भर घालणे.
- 'एसटीयु' च्या पंचवार्षिक योजनेनुसार "प्रस्तावित - पारेषण वाहिन्या/बेजच्या यादी" मध्ये भर टाकणे/काढून टाकण्याच्या संबंधात सुधारणा करणे.

३. टीपीसी-टी ने, अधिनियमाच्या कलम १८(२)(ए) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार लेखी सूचना किंवा हरकती मागविण्यासाठी (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) फायनान्शियल एक्सप्रेस (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी), (४) नवराष्ट्र (मराठी) या वृत्तपत्रांमध्ये दि. ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली होती. या सूचनेवर कोणतीही प्रतिक्रिया प्राप्त झाली नाही. टीपीसी-टी ने त्यांच्या सुधारणा अर्जाची एक प्रत राज्य पारेषण कंपनीला (एसटीयु) देखील अग्रेषित केली आहे.

४. राज्य पारेषण कंपनीने (एसटीयु) दि. २३ नोव्हेंबर, २०२२ आणि २० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सयुंक्त संयुक्तपडताळणी अहवाल सादर केला आहे, ज्यामध्ये एसटीयुने नवीन भर घातलेल्या मत्ता / मत्तांची अद्ययावत केलेली स्थिती याबाबत टीपीसी - टी कडून सादर करण्यात आलेल्या निवेदनांची पडताळणी केली आहे.

५. टीपीसी - टी ने सादर केलेला अर्ज आणि दस्तऐवज, एसटीयूचा दि. २३ नोव्हेंबर, २०२२ आणि २० जानेवारी, २०२३ रोजीचा अहवाल यांचे विश्लेषण केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, टीपीसी - टी यांना मंजूर केलेल्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये (दुसरी सुधारणा) मध्ये आयोगाच्या संकेत-स्थळावर अपलोड करण्यात आलेल्या परिशिष्ट - १ मध्ये दर्शवल्यानुसार, विद्युत अधिनियम, २०२३ आणि विनियमांमधील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, तिसरी सुधारणा करता येईल..

६. टीपीसी - टी ने आयोगाला सादर केलेलया अर्जाची प्रत, त्यासोबतची जोडपत्रे आणि सहपत्रे आणि एसटीयुचा अहवाल आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

७. प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तींना आयोगाच्या संकेत-स्थळावरील 'E-Public Consultation'या टॅबद्वारे त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी अपलोड करता येतील (www.merc.gov.in/e-public-consultation). या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान मोबाइल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

८. ज्या व्यक्तीने आयोगाच्या 'E-Public Consultation' या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यास त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतीची छापील प्रत **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०000५** या पत्यावर, या सूचना आणि हरकतींची प्रत दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड - ट्रान्समिशन, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१ (Email: srmehendale@tatapower.com) यांना देण्यात आल्याच्या पुराव्यासह, पाठवावी आणि त्यावर पाठविणाऱ्याने आपले पूर्ण नाव, पोस्टाचा आणि असल्यास ई-मेलचा पत्ता, कळवावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. **२१ मार्च २०२३** रोजी सायंकाळी **५.००** नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

९. टीपीसी - टी, **२१ मार्च , २०२३** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांमधील प्रत्येक हरकत/अभिप्रायास त्या प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत, परंतु **२४ मार्च, २०२३** नंतर नाही, उत्तर पाठविल. टीपीसी - टी ने दिलेल्या उत्तरांवर हितसंबंधित त्यांची प्रत्युत्तरे ई-जन सुनावणी दरम्यान किंवा **२७ मार्च, २०२३** पर्यंत, सादर करू शकतील.

१०. वरील परिच्छेद ७ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीला त्याचे/तिचे म्हणणे जाहीर ई-सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला **दि. २३ मार्च, २०२३ रोजी १०.३० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई-सुनावणीमध्ये त्यांचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल, त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

११. जाहीर ई-सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने **दि. १४ नोव्हेंबर, २०२२** रोजी जरी केलेल्या "याचिकेच्या ई-फायलिंग आणि ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची परीचालनात्मक कार्यपद्धती आणि प्रोटोकॉल' मधील कार्यप्रणाली निर्देशांचे पालन करतील.

**दिनांक: ०१.०३.२०२३**
**ठिकाण: मुंबई**

**सचिव, मविनिआ**

Size: 8x26